**प्रेसनोट दि.१६/०७/२०१९**

**कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे**

**हरविलेल्या मुलीस तिच्या वडिलांच्या ताब्यात सुखरुप दिले.**

दि.१५/०७/२०१९ रोजी १७.०० वा.चे सुमारास इसम नामे ईस्माईल इब्राहीम बागवान रा.नवाजीश चौक,मिठानगर कोढवां खुर्द पुणे यांनी त्यांची मुलगी  नामे आलीया ईस्माईल बागवान वय ५ वर्षे  रा.सदर हि रहाते घरातुन खेळत खेळत बाहेर गेली व नंतर कोठे गेली याबाबत ते त्रस्त झालेने व त्यांना काही सुचत नसलेने त्यांनी त्यांची वरील मुलगी हरविले बाबत तक्रार देण्यास कोढंवा पोलीस चौकीस आले व त्यांनी त्यांची मुलगी हरविली असुन ती मिळून येत नाही अशा केविलवाण्या भाषेत पोलीसांना सांगितलेने तेथे कर्तव्यार्थ असणा-या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी त्यानी प्रथमतः पाणी देवुन व शांत केले परंतू त्यांची मुली बाबतची विनवणी व केविलवाणा चेहरा अशी त्यांची दयनीय अवस्था झालेने चौकीस हजर असणारे पोलीस उप निरीक्षक चाउस यांनी कोढंवा मार्शल वरील पोलीस कर्मचारी पो.ना. २४२५ टपके व पो.ना.६८०६ पवार यांना सदर मुलीचे वर्णन तक्रार देणारे इसम यांचेकडून प्राप्त करून घेवुन लागलीच वरील पोलीस अधिकारी यांनी कोढवां मार्शल वरील पोलीस कर्मचारी यांना योग्य त्या सुचना देवुन तक्रार देणार यांचे रहाते घराचे आजु बाजुस व इतरत्र शोध घेणे बाबत सुचना दिलेने मार्शल वरील पोलीस कर्मचारी यांनी सदर मुलीचा शोध घेत असताना यातील वर्णनाची मुलगी हि के जे मौलाना अबू कलाम आझाद स्कूल,बिस्मील्ला हॉल जवळ कोढंवा खुर्द पुणे येथे रडत बसलेली दिसलेने वरील नमुद कर्मचारी यांनी सदर मुलीस कोंढवा पोलीस चौकी येथे घेवुन गेले व तक्रारदार यांना मिळून आलेली मुलगी दाखविलेवर त्यांनी अत्यंत गहिवरलेल्या अवस्थेत मान हलवुन त्यांचीच मुलगी असल्याचे सांगुन मुलीस कवटाळून जवळ घेतलेने सदर हरविलेल्या मुलीस तिचे वडीलांचे ताब्यात दिले सबब मुलीचे वडील यांनी हात जोडून कोंढवा पोलीस ठाणे कडील अधिकारी व कर्मचारी यांचे मनापासुन आभार मानले आहेत.

